हरणबारी मध्यम प्रकल्प, ता. बागलाण, जि. नाशिक- डाव्या कालव्याची लांबी वाढविणे (वाढविस्तार कामे) योजनेच्या अहवालास - प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०१७/४२८/(प्र.क्र. १५०/१७)/ म.प्र.

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- १० नोव्हेंबर, २०१७.

संदर्भ:- १) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा निर्णय क्र.तापाविम/काअ/प्रवि-१/२७-९८/प्रमा/२७, दि.०३/१०/१९९८.

२) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव यांचे पत्र क्र.मुअ/तापाविम/प्रशा-२/१५८६/सन- २०१७, दि.१२/०४/२०१७.

प्रस्तावना:-

हरणबारी मध्यम प्रकल्प हा तापी पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत नाशिक जिल्हातील बागलाण तालुक्यातील अंबापूर गावाजवळ मोसम नदीवर पूर्ण झालेला प्रकल्प आहे. हरणबारी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची लांबी वाढविणे या योजने अंतर्गत हरणबारी डाव्या कालव्याची लांबी २६ किमी ने वाढविण्याचे नियोजीत आहे. अस्तित्वातील हरणबारी मध्यम प्रकल्पाच्या १ ते ७ कि.मी. भागाचे नुतनीकरण व वाढीव कालव्याचे कि.मी. ८ ते ३३ (साखळी क्र. ७००१ ते ३३००० मी.) या लांबीमधील सा.क्र. १८५४० मी. ते २०६४० मी. दरम्यान Pipe siphon या मोठ्या बांधकामासह सर्व कामे प्रस्तावित आहेत.

हरणबारी मध्यम प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजना नुसार सदर योजेनेचा एकूण पाणीवापर ५७.८८ दलघफू (१.६३ द.ल.घ.मी) इतका आहे. सदर वाढीव कालव्याद्वारे हरणबारी धरणाच्या पूर पाण्याने अस्तित्वातील ९ पाझर तलाव (शेवरे, तुंगण दिगर, कातरवेल, दरेगाव, पिंपळ कोठे, तांदुळवाडी, नांदिन, वाडी पिसोळ क्र.२, व एकलहरे तलाव) व भविष्यातील बंधा-याचे ५०% क्षमतेने पूनर्भरण करण्याचे नियोजन आहे. या पाझर तलावांनी नाशिक जिल्ह्यातील बागलाण या अवर्षण प्रवण तालुक्यातील २४६ हे. क्षेत्रास अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होणार आहे.

हरणबारी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची लांबी वाढविणे या योजनेस संदर्भ क्र.१ नुसार सन १९९७-९८ चे दरसूचीवर आधारीत रू.६.७१ कोटी (रूपये सहा कोटी एकाहत्तर लक्ष फक्त) इतक्या रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे संदर्भ क्र.२ अन्वये सन २०१६-१७ चे दरसूचीवर आधारीत रु. ६२.६० कोटी किंमतीचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर केला आहे. प्रकल्पाचे लाभ व्यय गुणोत्तर ०.१० येत असून ही योजना आर्थिक मापदंडात बसत नाही.

सदर योजनेची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रु. ६.७१ कोटी च्या तुलनेत प्रथम सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रु.५५.८९ कोटीने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

अ.क्र.	बाब	वाढ (रुपये कोटी)
१	२	३
१	दरसूचीतील बदलामुळे	२८.७२
२	जास्त दराची निविदा स्विकृतीमुळे	०.३३
२	भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ	८.२१
३	अपु-या तरतुदीमुळे	१४.२३
४	इतर कारणामुळे	०.५४
५	अनुषंगिक खर्चातील वाढीमुळे	३.८६
	एकूण वाढ	**५५.८९**

नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रास अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालास विशेष बाब म्हणून मान्यता देणेचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता.

नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने सदर प्रस्ताव दि. ०७/०९/२०१७ रोजी व्यय अग्रक्रम समितीच्या पुढे विचारार्थ ठेवला असता व्यय अग्रक्रम समितीने प्रस्तावास काही अटींच्या अधिन राहून मान्यता दिली.

शासन निर्णय :-

शासन आता या निर्णयाव्दारे तापी खोऱ्यातील हरणबारी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची लांबी वाढविणे या योजनेच्या सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारीत रु.६२.६० कोटी (रुपये बासष्ठ कोटी साठ लक्ष फक्त) इतक्या किंमतीच्या प्रथम सुधारीत प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता

प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रु.५७.४० कोटी (रुपये सत्तावन कोटी चाळीस लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रु.५.२० कोटी (रुपये पाच कोटी विस लक्ष फक्त) अनुषंगिक खर्चासाठी तरतूद आहे. सोबत उपशिर्ष निहाय सुधारित तरतुदींचा गोषवारा दिलेला आहे.

२. या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मध्यम प्रकल्प कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये अनुक्रमांक ०४/ २०१७ वर नोंदवण्यात आली आहे.

३. सदर योजनेचे उर्वरित काम नियोजित वेळेत व सुधारित प्रशासकीय मान्यता तरतूदीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

४. या योजनेच्या कामावर होणारा खर्च मागणी क्रमांक- आय-५, ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, ८०-सर्वसाधारण, १९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (१२) योजनांतर्गत, विस्तार व सुधारणासाठी भाग भांडवली अंशदान (१२)(०३), तापी पाटबंधारे विकास महामंडळाला भाग भांडवली अंशदान (४७०१ जे १८५) या लेखाशिर्षाखाली खर्च टाकावा व त्याखालील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५.१) व्यय अग्रक्रम समितीच्या मान्यते नुसार हरणबारी धरणाचे पूर पाणी तळवडे भामेर ल.पा. तलावात सोडणे या प्रकल्पाचे/योजनेचे काम प्राधान्याने पूर्ण केल्यानंतर सदरहू प्रकल्पाचे काम निधी उपलब्ध झाल्यानंतर सुरू करावे.

५.२) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयी करण्याच्या विविध टप्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहित धरता येणार नाही.

५.३) या योजनेबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशीची कार्यवाही पूढे चालू ठेवावी. प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

५.४) मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीपेक्षा जादा खर्च करण्याच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करून संबंधीतांवर कार्यवाही करण्यात यावी.

५.५) कालव्या वरील उर्वरित बांधकामांचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून केल्यानंतरच कालव्यावरील पुढील बांधकाम हाती घेण्यात यावे.

५.६) सदर योजनेसाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपद्धती याची काटेकोरपणे अंबलबजावणी करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र.१२१/का.१४३४ दि.२०/०५/२०१७, वित्त विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र. २०३/२०१७/व्यय-१२, दि. ०१/०९/२०१७ व दि. ०७/०९/२०१७ रोजी झालेल्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१११०१३२७१८८६२७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2017.11.10 15:29:44 +05'30'

सहपत्र :-उपशीर्ष निहाय तरतुदींचा तपशील

(म.ई.धरणे)
शासनाचे उप सचिव

प्रत, सहपत्रांसह :-

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
१२) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
१३) मुख्य अभियंता (द.व प्र) व सहसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

१५) उपसचिव (मो.प्र-१/ मो.प्र-२/जसं/निवसं/सिंव्य/लाक्षेवि/लपा/जवि), यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७) अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे.

१८) कार्यकारी अभियंता, गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग, नाशिक.

१९) वित्त विभाग (व्यय-१२/ अर्थ-०२/अर्थ-१०/व्यय-६ अ), मंत्रालय, मुंबई.

२०) नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई.

२१) मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ.

उपशीर्ष निहाय तरतुदींचा तपशील

हरणबारी मध्यम प्रकल्प, ता. बागलाण, जि. नाशिक- डाव्या कालव्याची लांबी वाढविणे (वाढविस्तार कामे)- प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता

शासन निर्णय क्र.सुप्रमा-२०१७/४२८/(प्र.क्र.१५०/१७)/म.प्र., दि. १०/११/२०१७ चे सहपत्र.

अ.क्र.	उपशीर्ष	प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक (रुपये कोटी)
१.	२.	३.
१)	अ-प्राथमिक	०.२४
२)	ब-भूसंपादन	८.२५
३)	सी-कामे	०.००
४)	डी-रेग्युलेटर	०.१६
५)	ई-फ़ाल्स	०.१६
६)	एफ़-सीडी वर्क	३४.६२
७)	जी-पुल	२.२७
८)	के-इमारती	०.०१
९)	एल-मातीकाम	११.३२
१०)	एम-वृक्षारोपण	०.०३
११)	ओ-संकिर्ण	०.०५
१२)	पी-देखभाल	०.२४
१३)	आर-दळणवळण	०.०५
	एकूण कामाप्रित्यर्थ	**५७.४०**
	अनुषंगिक खर्च	**५.२०**
	एकूण	**६२.६०**